महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ९०९९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २८/०४/२०२१

# पूरकपत्र

**विषय : करोना विषाणू रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना सहायता करणेबाबत.**

**संदर्भ :** मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ८४३९ दि. २०.०४.२०२१.

कोवीड- १९ मुळे उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीमध्ये संदर्भित परिपत्रकान्वये कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विविध हितकारक निर्णय व अनुषंगीक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. ४ (क) नुसार ज्या कर्मचाऱ्यांना कोवीड-१९ विषाणूची बाधा झाली आहे / होती किंवा शासनाच्या सूचनांच्या अनुषंगाने ज्यांचे विलगीकरण (Quarantine) करण्यात आलेले आहे / होते अशा कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा अथवा विलगीकरणाचा कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. सदर तरतुदीबाबत क्षेत्रिय कार्यालयांकडून काही मुद्दे उपस्थित करण्यात आल्यामुळे याबाबत खालील तपशिलवार सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

क) एखादा कर्मचारी कोवीड-१९ बाधित असल्याचे आढळल्यास त्याच्या चाचणी अहवाल दिनांकापासून १४ दिवसांच्या अनुपस्थितीचा कालावधी हा कर्तव्य कालावधी समजण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची रजा सादर करणे आवश्यक नाही. परंतू कर्मचाऱ्याने चाचणी अहवाल नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील.

ख) सदर १४ दिवसांच्या कालावधीनंतर कर्मचाऱ्यास वैद्यकीय कारणास्तव कामावर अनुपस्थित राहण्याची आवश्यकता भासल्यास वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे आणखी ७ दिवसांपर्यंत सदरची सवलत देण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची रजा सादर करणे आवश्यक नाही. परंतू कर्मचाऱ्याने वैद्यकीय प्रमाणपत्र नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील.

ग) उपरोक्त १४ आणि ७ असा एकूण २१ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर देखील कर्मचाऱ्यास अनुपस्थित रहावे लागल्यास कर्मचाऱ्यास त्याच्या खात्यावरील शिल्लक असणारी रजा उपभोगण्यास परवानगी देता येईल.

घ) एखादा कर्मचारी पूर्वीपासून मंजूर रजेवर असताना कोवीड-१९ बाधित झाल्यास तो बाधित झाल्याच्या दिनांकापासून वरील (क) व (ख) नुसार कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

च) गंभीर वैद्यकीय परिस्थिती उदभवल्यामुळे २१ दिवसांच्या कालावधीनंतर कर्मचारी रूग्णालयात उपचार घेत असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे कर्मचाऱ्याचा अनुपस्थितीचा पूर्ण कालावधी कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

छ) ज्या कर्मचाऱ्याकडे अन्य पदाचा अतिरिक्त भार सोपविण्यात आला आहे, असा कर्मचारी कोवीड-१९ बाधित झाल्यास वरील सूचनांनुसार त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी जरी कर्तव्य कालावधी समजण्यात आला तरी अनुपस्थितीच्या कालावधीमध्ये तो अतिरिक्त कार्यभार भत्ता मिळण्यास पात्र असणार नाही. तसेच कोवीड-१९ बाधित कर्मचाऱ्याच्या अनुपस्थितीमध्ये अन्य कर्मचाऱ्यास त्याच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला असल्यास अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला कर्मचारी सदर भत्ता मिळण्यास पात्र असेल.

ज) माहे मार्च २०२० पासून आजअखेर विलगीकरण/ कोवीड-१९ उपचारांकरीता ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या खात्यावरील रजा खर्ची पडली असेल, अशा प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याने Employee Portal व्दारे वैद्यकीय कागदपत्रे सादर केल्यानंतर सदर कागदपत्रांच्या आधारे त्याचा रजा कालावधी वरील सूचनांनुसार कर्तव्य कालावधी समजण्यात यावा व खर्ची पडलेली रजा पुन:श्च संबंधिताच्या खात्यावर जमा करण्यात यावी. जे कर्मचारी वरील कालावधीमध्ये सेवानिवृत्त झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचा पुनर्विचार करण्यात येणार नाही.

३. सबब, सर्व सक्षम अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेउन कोवीड-१९ बाधित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर पूरकपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**